# सुंदरमच्या 'इ-क्लास'चा विस्तार; पहिली ते दहावी इयत्तांचा समावेश

## 'इ-क्लास' राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहचण्यासाठी स्टेशनरी दुकानांमध्ये ६०० एलसीडी बसवणार



**मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)**

सुंदरम एज्युसिस प्रायव्हेट लिमिटेड या सुंदरम मल्टी पॅप लिमिटेडच्या उपकंपनीने जुलै २०१० मध्ये 'इ-क्लास' या ब्रँड नावाखाली महाराष्ट्रातल्या इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळेत शिकणाऱ्या आठवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी जगात पहिल्यांदाच अत्यंत नाविण्यपुर्ण असा एज्युकेशन कंटेंट यशस्वीपणे सुरु केला होता.

सुंदरची 'इ-क्लास' ही संकल्पना विद्यार्थ्यांकरिता फारच यशस्वी ठरली. महाराष्ट्राच्या दुर्गमभागासह सर्व महत्वाची शहरे, विद्यार्थी, शाळा आणि कोचिंग क्लासेसकडून या संकल्पनेला भरघोस प्रतिसाद मिळाल्यामुळे आता त्यामुळे कंपनीने या 'इ-क्लास' संकल्पनेचा आणखी विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून त्यामध्ये आता इंग्रजी,मराठी आणि सेमी इंग्लीश माध्यमात शिकणाऱ्या सर्व पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सिलॅबसमध्ये समावेश केला आहे.

सुंदरम मल्टी पॅप लि. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अमृत पी. शहा यांनी माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र शैक्षणिक महामंडळाचे सर्व विद्यार्थी त्याचप्रमाणे इतर ग्राहकांपर्यंत 'इ-क्लास' संकलपना पोहचवण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले असून राज्याच्या ग्रामीण भागांबरोबरच शहरातील रिटेल स्टेशनरी दुकानांमध्ये ६०० एलसीडी टीव्ही बसवण्यात येणार आहे. जेणे करुन संपूर्ण महाराष्ट्रात 'इ-क्लास' संकल्पना पोहचवून विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारेल. पर्यायाने चांगले जीवन जगण्यासाठी त्यांना करिअरच्या चांगल्यात चांगल्या संधी उपलब्ध होवून त्यांचे जीवनमान उंचावेल. समाजातल्या खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत ही सेवा पोहचवण्यासाठी राज्यातील दुर्गम भागात संपर्क साधणे महत्वाचे आहे. त्यासाठी कंपनी कार्पोरेट आणि एनजीओ यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे.

सध्या हजारो कोचिंग क्लास, शाळा आणि तसेच विद्यार्थी व्यक्तीशः 'इ-क्लास' चा यशस्वीपणे उपयोग करत आहेत. अलिकडेच केलेल्या एका सर्वेक्षणामध्ये या विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम गुण मिळवल्याचे दिसून आले. गेल्या वर्षी इयत्ता नववीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना ७५ ते ८० टक्के गुण मिळाले. विशेष म्हणजे याच विद्यार्थ्यांनी 'इ-क्लास'ची मदत घेतल्यानंतर त्यांना यंदाच्या वर्षाच्या दहावीच्या प्रिलिम परिक्षेत ९४ ते ९५ टक्के गुण मिळवता येऊ शकले. याच स्वरुपाचा अनुभव यंदाच्या वर्षी अनेक 'इ-क्लास' परीक्षांबाबतही दिसून आला.

सुंदरमने विकसित केलेल्या हा ॲकॉडमी कंटेंट जगातील पहिलाच असा उपक्रम आहे. ज्यामध्ये टीव्ही, कॉम्प्युटर, प्रोजेक्टर, सर्व्हर रुम किंवा कॉम्प्यूटर लॅब अशा अतिशय युझरफ्रेंडली व्यासपीठाच्या माध्यमातून सर्वच जणांना मग ते विद्यार्थी असोत, पालक असोत कि शिक्षक. शहरी, ग्रामीण भागातील शाळा व्यवस्थापनाला या सर्वांनाच 'इ-क्लास' चा लाभ होऊ शकेल. राज्यामध्ये रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणे, साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि एकुणच सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने सुंदरमने उचललेले हे अतिशय योग्य पाऊल आहे.

सुंदरम मल्टी पॅप लिमिटेड ही मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजारात नोंदणी असलेली कंपनी असून अगदी लेखन उत्पादनांच्या निर्मितीमध्ये ती बाजारातील एक अग्रेसर कंपनी आहे.